सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१७०-२०१६

नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६

निशाणी क्र. ९० वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. ४ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र.४ सत्यवती लवू पाटकर पुर्वाश्रमीची सत्यवती गणपत तेली उर्फ कुवळेकर ही दि.१३/१०/२०२३ रोजी मयत झाली आहे. तरी त्याबाबत मुदतीत तजवीज करणे आवश्यक व जरुरीचे होते. परंतु, वादी यांना मुदतीत प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांची तजवीज करता आलेली नाही. तरी प्रतिवादी क्र.४ चे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत यावा अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर अर्जातील कारणे ही खोटी व खोडसाळ असून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.९३ च्या यादी सोबत मयत प्रतिवादी क्र.४ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.४ सत्यवती लवू पाटकर या दि.१३/१०/२०२३ येथे मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र.४ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदर विलंब माफ करणे न्यायोचीत वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीला रक्कम रुपये २००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.07.23 15:16:11 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः २२/०७/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.